नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २२९ Issue - 229 | वार रविवार दि. ५ जानेवारी २०२५ Blow- Sunday Date 5 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### भौतिकशास्त्रज्ञ आर. चिदंबरम यांचे निधन



नवी दिल्ली : भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमात निर्णायक भूमिका बजावणारे भौतिकशास्त्रज्ञ डॉ. राजगोपाल चिदंबरम यांचे शनिवारी वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. अणुऊर्जा विभागाने (ऊए) दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील जस–लोक रुग्णालयात त्यांचे निधन झाले. हे जाहीर करताना आम्हाला दु:ख होत आहे की, प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ आणि भारतातील सर्वात प्रतिष्ठित शास्त्रज्ञांपैकी एक असलेले डॉ. राजगोपाल चिदंबरम यांचे आज (४ जानेवारी २०२५) पहाटे ३.२० वाजता निधन झाले. डॉ. चिदंबरम यांचे भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रातील योगदान अतुलनीय आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे दूरदर्शी नेतृत्व कायम स्मरणात राहील, असे डीएईने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. राजगोपाल चिदंबरम यांच्या निधनानंतर, त्यांना आदरांजली वाहताना म्हटले की, डॉ. राजगोपाल चिदंबरम यांच्या निधनाने खूप दुःख झाले. ते भारताच्या आण्विक कार्यक्रमाचे प्रमुख शिल्पकार होते आणि त्यांनी भारताच्या वैज्ञानिक आणि सामरिक क्षमतांना बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १९३६ मध्ये जन्मलेले डॉ. चिदंबरम चेन्नईतील प्रेसिडेन्सी कॉलेज आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरूचे माजी विद्यार्थी होते. डॉ. चिदंबरम यांना त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल १९७५ मध्ये पद्मश्री आणि १९९९ मध्ये पद्मविभूषण, तसेच अनेक विद्यापीठांकडून मानद डॉक्टरेटसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. चिदंबरम यांनी त्यांच्या कारकिर्दीत भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार (२००१–२०१८), भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक (१९९०–१९९३), अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष (१९९३–२०००) अशा अनेक प्रतिष्ठित पदांवर काम केले आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणी फरार आरोपी ताब्यात, एकजण अजूनही फरार

## गेल्या महिनाभरापासून फरार होते आरोपी; पुण्यात झाली कारवाई




**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

पुणे : संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील फरार आरोपींमधील दोघांना पोलिसांनी पकडलं आहे. मुख्य आरोपी असलेले सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे गेल्या महिनाभरापासून फरार होते. अखेर पोलिसांना या आरोपींना पकडण्यात यश आले आहे. वाल्मिक कराड पाठोपाठ आता हत्या करणाऱ्या आरोपींना ताब्यात घेतल्याने तपासाला गती येणार आहे. खुनातील फरार आरोपी अटक करण्यासाठी बीड पोलीसाचे विशेष शोध पथक नेमण्यात आले होते. डॉ. संभाजी वायभसे याची चौकशी करुन गोपनीय माहितगार नेमत आणि तांत्रिक कौशल्याचा उपयोग करुन सुदर्शन चंद्रभान घुले वय २६ रा.टाकळी ता.केज आणि सुधीर ज्ञानोबा सांगळे वय २३ रा. टाकळी ता.केज यांना ताब्यात घेतलं आहे. आता या आरोपींना गुन्हे अन्वेषण विभाग बीडचे अनिल गुजर, पोलीस उप अधीक्षक यांच्या ताब्यात देणयात आलं आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणामध्ये विष्णू चाटे, प्रतीक घुले आणि महेश केदार यांना आधी पोलिसांनी अटक केली होती. तीन आरोपी फरार होते, यामध्ये सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि कृष्णा आंधळे फरार होते. यामधील आता सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळेला पोलिसांना अटक केलीय. मात्र कृष्णा आंधळे हा अजूनही फरार आहे. ९ डिसेंबरला संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली होती. तेव्हापासून मुख्य आरोपी फरार होते. पुण्यामध्ये सापडलेल्या आरोपींची पोलिसांना आधी कशी माहिती मिळाली नाही? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

३१ डिसेंबरला वाल्मिक कराड याने पुण्यातील मुख्यालयामध्ये सरेंडर केले होते. त्यानंतर त्याला १४ जानेवारीपर्यंत कोठडी सुनावण्यात आली आहे. आता कराडची चौकशी सुरू असताना सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना अटक झाल्याने आता सीआयडी आणि एसआयटीलाही या प्रकरणाच्या मास्टरमाईंडपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

केज तालुक्यातील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेने संपूर्ण देशभरात खळबळ उडाली होती. या प्रकरणाचे पडसाद विधानसभा अधिवेशनातही पाहायला मिळाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटीची स्थापना करण्याची घोषणा केली. या प्रकरणामध्ये धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड यालाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराचा ट्रक दरीत कोसळला; तीन जवानांचा मृत्यू, दहा दिवसातील दुसरी घटना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू-काश्मीरमधील बांदीपोरा या ठिकाणी आज (४ जानेवारी) लष्कराच्या वाहनाला अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत तीन जवानांचा मृत्यू झाला असल्याची माहिती सांगितली जात आहे. तसेच यामध्ये काहीजण गंभीर जखमी झाले आहेत. जम्मू-काश्मीरच्या बांदीपोरा या ठिकाणी सैनिकांना घेऊन जात असलेला लष्कराचा ट्रक रस्त्यावरून अचानक घसरला आणि दरीत कोसळला. या अपघातात तीन जवानांचा मृत्यू झाला आहे.

या अपघातात जखमी झालेल्या जवानांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. लष्कराच्या अधिकाऱ्यांनी या अपघाताची माहिती देताना म्हटलं की, लष्कराचं वाहन रस्त्यावरून घसरलं आहे. उत्तर काश्मीर जिल्ह्यातील एसके पायनजवळ खोल दरीत हा ट्रक कोसळला. यामध्ये तीन जवानांचा मृत्यू झाला आहे. तसेच काही जवान जखमी झाले, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. जम्मू-काश्मीरमधील एसके पायनजवळ वळण घेण्याच्या प्रयत्नात असताना लष्कराच्या ट्रक चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक दरीत कोसळून हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती सांगितली जात आहे.

या अपघाताच्या घटनेनंतर घटनास्थळी सुरक्षा दल आणि पोलीस दाखल झाले आहेत. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. दरम्यान, लष्कराच्या वाहनाला अपघात झाल्याच्या अनेक घटना याआधीही घडल्या आहेत. २४ डिसेंबर २०२४ रोजी पूंछ जिल्ह्यात लष्कराचे वाहन उलटून ३५० फूट खोल दरीत कोसळले होते. या अपघातात पाच जवानांचा मृत्यू झाला होता. तसेच पाच जण जखमी झाले होते. तसेच त्याआधी ४ नोव्हेंबर २०२४ रोजी राजौरी जिल्ह्यात एका लष्करी जवानाचा मृत्यू झाला होता. तेव्हाही लष्कराचे वाहन रस्त्यावरून घसरून दरीत कोसळले होते. यानंतर आजही अशाच प्रकारची घटना घडली आहे.

## सर्व आरोपी पुण्यातच कसे सापडत आहेत? संतोष देशमुख हत्येप्रकरणी सुप्रिया सुळेंचा सवाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली होती. त्यामुळे अजूनही राज्यभरात संताप व्यक्त होत आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येला २५ दिवस होऊनही पोलिसांना अद्याप सर्व मारेकऱ्यांना अटक करता आलेली नाही. दरम्यान आज सकाळी मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह सुधीर सांगळेला पुण्यातून अटक करण्यात आले आहे. सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे संतोष देशमुख यांची हत्या झाल्यापासून फरार होते. त्यांना पकडण्यासाठी सीआयडीने प्रसिद्धीपत्रक जारी करत त्यांना फरार घोषित केले होते. या प्रकरणातील तिसरा आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. मुख्य आरोपींपैकी दोघांना आज पुण्यातून अटक केल्यानंतर बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी, या प्रकरणातील सर्व आरोपी पुण्यातच कसे सापडत आहेत, असा प्रश्न उपस्थित केला आहे.

राष्ट्रवादीच्या (शरद पवार) बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज संतोष देशमुख हत्या प्रकरणावर माध्यमांशी संवाद साधला.

## कोटींचा भ्रष्टाचार उघड केला, पत्रकाराची हत्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायपूर : छत्तीसगडमधील पत्रकार मुकेश चंद्राकारच्या हत्या प्रकरणाचं गूढ उकललं आहे. चंद्राकारचा चुलत भाऊच त्यांचा मारेकरी निघाला. २८ वर्षीय मुकेश चंद्राकारच्या हत्या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यात मुकेश यांचा भाऊ रितेश चंद्राकारचाही समावेश आहे. मुकेश त्याच्या शोध पत्रकारितेसाठी ओळखला जायचा. सरकारी योजना, प्रकल्पांमधील अनेक घोटाळे, अपहार त्यानं आपल्या वृत्तांकनामधून समोर आणले होते.

मुकेश चंद्राकारनं काही दिवसांपूर्वीच बस्तर परिसरातील गंगापूर ते हिरोलीला जाणाऱ्या १२० कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामातील कथित भ्रष्टाचार योजना बाहेर काढला. या रस्त्याच्या कामासाठी आधी ५० कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली. त्यानंतर ही रक्कम १२० कोटी रुपये करण्यात आली. रस्त्याचं कंत्राट सुरेश चंद्राकार यांना मिळालं होतं. मुकेश यांच्या बातमीनंतर राज्य सरकारनं चौकशी सुरु केली. त्यामुळे कंत्राटदार लॉबीत खळबळ उडाली.

सुरेश चंद्राकारचा भाऊ रितेशनं १ जानेवारीच्या रात्री मुकेशची कंत्राटदारासोबत बैठक निश्चित केली होती. या भेटीनंतर मुकेश यांचा मोबाईल स्विच्ड ऑफ झाला. मुकेश बेपत्ता झाल्याचं त्याचा मोठा भाऊ युकेश चंद्राकारनं सांगितलं. दोन दिवसांनंतर मुकेशचा मृतदेह चट्टनपारा येथील सुकेश यांच्या मालकीच्या एका मालमत्तेमधील सेप्टिक टँकमध्ये सापडला. तिकडेच तो शेवटचा दिसला होता. पोलिसांनी रितेश आणि कुटुंबातील एक अन्य सदस्य दिनेश चंद्राकारसह ३ संशयितांना अटक केली आहे. भ्रष्टाचारामुळे चर्चेत आलेला कंत्राटदार सुरेश अद्याप फरार आहे. पोलीस दलातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुकेश आणि रितेश यांच्यात चांगली मैत्री आहे. जिथे पत्रकार मुकेशचा मृतदेह सापडला, तिकडे दोघे अनेकदा भेटायचे. रस्ते बांधकामात घोटाळा मुकेशनं उजेडात आणल्यानं त्यांच्या नात्यात कटुता आली. या प्रकरणात मुकेशच्या कुटुंबाला कोणतीही थेट धमकी देण्यात आलेली नव्हती. मुकेश स्थानिक मुद्द्यांवर निडर पत्रकारिता करायचा. त्याची निर्भीड पत्रकारिता, वृत्तांकन चर्चेचा विषय ठरलं. या प्रकरणी सखोल तपास करण्याचं आश्वासन राज्य सरकारकडून देण्यात आलेलं आहे.

## ... तर मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही : जरांगे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमधील उर्वरित आरोपी लवकर पकडावेत आणि सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, यासाठी आज परभणी जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात मराठ आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणातून सरकार आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली. संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख तपासाचा पाठपुरावा करण्यासाठी पोलीस ठाण्यात गेले असता त्यांना धमकविण्यात आले होते. याची कुणकुण लागल्यानंतर जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. मनोज जरांगे पाटील भाषणात म्हणाले की, धनंजय देशमुख यांना पोलीस ठाण्यात धमकविण्यात आले, अशी माहिती आम्हाला मिळाली. मी कुणाचेही नाव घेऊन उगाच बोलत नाही. पण यापुढे संतोष देशमुख यांचे कुटुंबिय आणि त्यांचे भाऊ धनंजय देशमुख यांच्या केसाला जरी धक्का लागला तर धनंजय मुंडेंना रस्त्यावरही फिरू देणार नाही. आमचा एक भाऊ गेला, तो आम्ही सहन केला. आतापर्यंत आम्ही कुणाचेही नाव घेतले नाही. पण यापुढे देशमुख कुटुंबियांना जर त्रास झाला तर एकाला सुद्धा रस्त्याने फिरू देणार नाही. मनोज जरांगे पुढे म्हणाले, आम्हाला माज किंवा मस्ती नाही. पण आमची मुले जर रस्त्यावर येणार असतील तर आमच्यापुढे आता पर्याय नाही. तुम्ही लोकांना मारून आरोपींना घरात लपवून ठेवत असाल तर हे कसे काय सहन करायचे. सगळे आरोपी पुण्यातच नेमके कसे सापडायला लागले? याचा अर्थ तुमच्या सरकारमधील मंत्री आरोपींना सांभाळत होते. या हत्येमधील आरोपी आणि खंडणीमध्ये पकडलेल्या आरोपींची नार्को टेस्ट केली पाहीजे.

## कोणत्या योजनेचा लाभ घ्यायचा? हे महिलांनी ठरवावं, लाडकी बहीण योजनेबाबत कृषीमंत्री कोकाटेंचं मोठं विधान

# 'दोन्ही पैकी एकाच योजनेत सहभाग नोंदवा'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार स्थापन झालं. सरकार स्थापन झाल्यानंतर लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. मात्र, यातही अद्याप काही महिलांना डिसेंबरचा हप्ता जमा झाला असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र, आता काही लाभार्थी महिला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. याचं कारण म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत आता निकष लावण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे. एवढंच नाही तर 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेत निकष डावलून लाभ घेतलेल्यांवर कारवाई सुरू झाली आहे. धुळे जिल्ह्यात एका लाभार्थी महिलेला मिळालेले साडेसात हजार रुपये सरकारच्या तिजोरीत पुन्हा जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे आता 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेला निकषाची कात्री लागणार असल्याचं बोललं जात आहे. यातच नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येणार की नाही? याबाबत आता कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी मोठं विधान केलं आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यायचा की नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घ्यायचा? हे महिलांनी ठरवावं, असं विधान लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलं आहे.

नमो शेतकरी महासन्मान योजना आणि लाडकी बहीण योजना असा कोणता लाभ घेता येईल किंवा दोन्ही योजनेचा लाभ घेता येईल का? असा प्रश्न पत्रकार परिषदेत कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना विचारण्यात आला. यावर उत्तर देताना कृषीमंत्री कोकाटे यांनी म्हटलं की, एका वेळी दोन योजनांचा लाभ घेता येत नाही. हा नियम आहे. त्यामुळे महिलांनी हा निर्णय घ्यायचा आहे. लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यायचा की नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घ्यायचा? हे त्यांनी ठरवायचं आहे, असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेचा लाभ महिला घेत असतील तर शेतकरी महासन्मान योजनेचे पैसे वजा होतील, असा काही निर्णय झालेला आहे का? असं विचारलं असता कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं की, असा निर्णय झालेला नाही. मात्र, दोन्ही पैकी एका योजनेत महिलांनी सहभाग नोंदवावा, असं कोकाटे यांनी स्पष्ट केलं. कोकाटे पुढे म्हणाले, सरकारच्या योजनेत एका माणसाला दोन योजनांचा फायदा घेता येतो का? नाही घेता येत. एक शेतकरी एकाच जमीनीवर दोन बँकेकडून कर्ज घेऊ शकतो का? नाही घेऊ शकत. मग जे नियम इतरांना आहेत तेच नियम या ठिकाणीही लागू होतील. योजना वेगळ्या असल्या तरीही. अन्यथा दोन योजनांचा लाभ महिला घेऊ शकतील असा जीआर सरकारला काढावा लागेल, असंही कृषीमंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले आहेत.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

रविवार दि. ५ जानेवारी २०२५


# देव व दैव नाकारा (सावित्रीबाई फुलेचे भाषण)



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाषा राजकारण करते. भाषा संवाद साधते भाषेतून विचार करता येतो. तो विचार ती भाषा भाषा विचार पोहोचविते पण भाषेच्या वापरकर्त्या संवादाच्या भूमिकांची असेल, तर खूप महत्त्वाची असते. सनातनवादी आणि सुधारक यांच्या भाषा संघर्षाचा इतिहास म्हणजेच प्रबोधनाचे अंतरंग असतात .सनातन वाद्यांची भाषा श्रद्धा भाषा असते. तर प्रबोधनकर्त्यांची भाषा विचार भाषा असते. मुळात भाषेच्या या सर्व उपयोजन व हेतू बाबत वाद होतात .भाषेला शुद्ध अशुद्ध ठरवून त्या भाषेतील विचार नाकारण्याचे राजकारण सनातनी करीत असतात. भाषेचे अशुद्धता आणि भाषेच्या वापरकर्त्याचे हेतू हे न पाहता सुधारक विचारांवर फुली मारण्याचे काम सर्वच कालखंडामध्ये चालू असते. भाषेची शुद्धता हीच प्रमाण मानून प्रबोधन पुढे नेणारे लोक हे ढोंगी असतात ते कृतक साहित्य व्यवहार हाच खरा व्यवहार आहे. असे मानण्यास भाषिकांना वाचकांना भाग पाडतात त्यामुळे भाषेचे राजकारण भाषेचे उपयोजन भाषेची अभिजातता भाषेचे हेतू हे न समजणारा बहुबसंख्यांक वाचक भाषिक हा नेहमी गोंधळलेला असतो. मुळात भाषेच्या श्रद्धा संवेदना आणि विचार भावना यातील फरक वाचकांना सुस्पष्ट कळत नाही श्रद्धेच्या अंतरंगात संस्कृतीचे कुटिल राजकारण भरलेले असते श्रद्धेला पुढे अस्मितेचे भक्तीचे मुक्तीचे स्वरूप भाषिक प्राप्त करून देतात आणि त्यामुळेच श्रद्धाभाषा व विचार भाषा यांचे द्वंद्व साहित्य व्यवहारात उभे केले जाते. याला वाद विवाद म्हणतात.

सुधारकांची भाषा आणि सनातन्यांची भाषा यांचा भाषेच्या अंगाने खोलात जाऊन विचार केला जात नाही. सुधारकांची भाषा सुगम असते ती बोली आणि मौखिक भाषेचा वापर करून अंतकरणाला थेट भिडण्यासाठी वापरली जाते. सुधारक भाषेचे कार्य दोन प्रकारे चालते विचाराचे स्पष्टीकरण विचार संदेशाचे खोलवर दूरपर्यंत रोपण करणे. हे त्यांचे हे दोन हेतू असतात सुधारकांच्या विचार भाषेचे सूत्र तर्क अनुमान सत्यता आणि सिद्धांत असे असते .त्यामुळे निरक्षर व्यक्तीने जनसमूहाला सुधारक भाषा तात्काळ पडते ती समजते म्हणून सुधारकांच्या भाषेचे प्रयोजन स्पष्ट होते सुधारकांच्या भाषेमधील विचार हा व्यक्तीच्या जीर्ण श्रद्धा आचरण बदलले यासाठीच ते असतात, म्हणून सुधारकांची भाषा आणि सनातन्यांची भाषा यातील फरक सतत करून तू समजावून सांगण्याची गरज भासते. सुधारकांच्या भाषेला वचने सुभाषिते अपवादात्मक असतात, पण सनातन यांच्या भाषेत या सिद्धांत वचने यांची खैरात असते त्यामुळे ही बोजड भाषा ही भारदस्त भाषा ही ज्ञानग्रहणभाषा म्हणून प्रथम दर्शनी ती प्रभाव पाडते पण भाषेचे सुगमपण आणि भाषेचे बोजड पण अर्थातच क्लिष्ट भाषा हे ठरवून दोन वाद भाषिक राजकारणी तयार करीत असतात, आणि अधिमन्यता भाषा व्यवहाराचे प्रभुत्व नियंत्रक अधिकार ते स्वतःकडे घेतात म्हणून तर भाषेचे राजकारणी हे कपटवादी धूर्त व संस्कृतीचे नियंत्रक म्हणून अंतस्थ काम करीत असतात. हे नेहमी समजून घेण्याची नितांत गरज असते.

प्रस्तुत लेखामध्ये सत्यशोधक सावित्रीबाई फुले यांच्या भाषेचे स्वरूप हेतू आणि प्रभाव यांचा विविध अंगी विचार करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे .वर नमूद केल्याप्रमाणे सुधारकांची भाषा अंतकरण ला भिडते. ती सोपी भाषा असते. ती सुगम असते .ती रचनेच्या पातळीवर छोट्या वाक्यांच्या स्वरूपाची असते. अशा भाषेच यश हे प्रबोधनाच यश असते .म्हणून प्रबोधनकर्त्यांची भाषा सुधारकांची भाषा यांच्या यशासाठी ती सर्व दूर प्रसारित होण्यासाठी व पोहोचण्यासाठी आणि सर्वात म्हणजे अंतकरणात जाऊन ती भिडण्यासाठी तशी वापरली जाते का? या प्रश्नाचाही विचार करणे महत्त्वाचे ठरते. सावित्रीबाई फुले यांचे कार्य स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणे सत्यशोधक विचार प्रचार करणे बालसुधारग्रह चालविणे काव्य रचना करणे क्रांती जोतिबा फुले यांच्या विचाराचे अनुयायीत्व स्वीकारणे आणि कृतिशील व करुणाशील जीवन जगणे ही सूत्री त्यांनी आपल्या जीवनामध्ये अंतिम श्वासापर्यंत पालन केल्याचे आढळून येते. सावित्रीबाई फुले यांची भाषा आणि भाषणे ही यासाठीच समजावून घेतली पाहिजेत.

आद्य स्त्री शिक्षिका सत्यशोधक समाजाच्या प्रमुख संस्थापिका आणि प्रचारक म्हणून काम करीत असताना त्या कालखंडामध्ये नव साक्षर झालेल्या सावित्रीबाई फुले यांच्या भाषेचा सांस्कृतिक आकलनाचा धर्म चिकित्सेचा आधुनिक विचार स्वीकाराचा समतेच्या आग्रहाचा स्त्रीच्या मातृत्व वैधव्य या घटनांचा त्या कसा विचार करतात या अंगाने सावित्री फुले यांची भाषा आणि भाषणे ही मराठी साहित्यामध्ये भाषेचे उपयोजन आणि हेतू आणि प्रबोधनाचा स्वीकार या पातळीवर त्या कशा यशस्वी झाल्या? यासाठी याचे परिशिलन होणे खूप महत्त्वाचे आहे प्रतिकूल कालखंड निरक्षर शूद्र समाज आणि आंतरिक कळवळा या भिन्न पातळ्यांवर काम करताना सावित्रीबाईंच्या भाषेचे महत्त्व कायम ठरते

सावित्री फुले यांच्या चरित्र साधनांमध्ये आढळून येणारी १८९२ नंतरची पाच भाषणे उपलब्ध आहेत. त्या भाषणांचा खोलात जाऊन विचार केला असता सावित्रीबाई फुले या अंतरिक कळवळ्याने विचार प्रकट करत असल्याचे आढळून येते. त्यांचा क्षोर्ता दलित बहुजन आहे. स्त्रिया आहेत .धर्म व्यवस्थेने लाभलेल्या गुलामगिरीतून बहुजन समाजाला मुक्त करण्यासाठी ज्ञान

हत्याराचा वापर करायला हवा हे सांगतच असतानाच सावित्रीबाई बहुजन समाजाला अनेक प्रकारचे उपदेश आपल्या भाषणांमधून करतात.

सावित्री फुले यांच्या भाषणात

देव आणि उद्योग देव आणि कर्म यांचा फरक स्पष्ट करणारी भाषणे त्यांनी दिली होती.

उद्योग या विषयावरील त्यांचे असेच भाषण

आळस टाकून द्या.

दीर्घोउद्योगी बना.

न थकता श्रम करा.

पैसा हे हे एक मुख्य साधन आहे.

सावित्रीबाई फुले आपल्या भाषणात म्हणतात उद्योगाचीच संगत धरून त्यावर भरवसा ठेवल्यास तो आपल्या उपयोगी सतत पडेल.

हे मी निशाणी तुम्हाला सांगत आहे.

देव हा एक काल्पनिक सहाय्यक करत आहे. असे बहुतेक लोक समजतात. पण हा साह्यकर्ता सत्य नसून बेभरवशाचा असून, मानव उद्योग यात भेद पाडून त्यांच्यात शत्रुत्व उत्पन्न करतो. माणसास आळशी बनवतो.

पाप-पुण्याप्रमाणे मनुष्याला परिस्थिती प्राप्त होत, असून त्या सुखदुःख प्राप्त होतात.

या प्रारब्धाच्या कल्पनेमुळे महार मांग कुणबी मराठी या साऱ्या जातीची लोक नीट ठरवून हजारो वर्षे अज्ञानी राहिले.

ज्ञानदारी व अर्थधारी लोकांच्या ब्रह्म्याला त्यांना सुखी करता येत, नसून लोकांच्या पूर्वसंचितात ढवळाढवळ करता येत नाही.

त्याला दैन्यामध्ये काहीच ढवळाढवळ करता येत नसल्याने शूद्र आधी अतिशूद्र लोकांनी पूर्वसंचित समजून पशूच्या जीवनाचे जगावे असे पक्के होऊन, त्याप्रमाणे आज तागायत जगत असून त्यांना आपण मनुष्यप्राणी आहे.

याचा विसर पडला व ते पशुप्रमाणे गुलामगिरीचे उद्योग करू लागले. त्यांचे उद्योगात ज्ञान नसून ढोर मेहनत असते. ती त्यांना फक्त जगण्यास मदत करत असते. यावरून उद्योग दोन प्रकारचे असून एक विचारू उद्योग दुसरा विचार नसलेला उद्योग अभ्यास करणे. हा एक उद्योग आहे. या उद्योगात डोळे कान व बुद्धी या इंद्रियाची जरुरी आहे. अर्धी भाकरी मला असे ओरडत भीक मागणे.

हाही एक उद्योग पण त्यास विचार नसलेला उद्योग म्हणतात.

सावित्रीबाई फुले याच भाषणात युरोपियन लोकांचे उदाहरण देतात. युरोपियन लोक देवावर विश्वास ठेवणारे असते .तर ते अशा तऱ्हेने अद्भुत गोष्टी न करते त्यांच्या उद्योगात वेळेचे महत्व फार असून ते कोणतेही काम वेळच्यावेळी करीत असून आपल्या आयुष्याचा काटेकोरपणे हिशोब करतात.

इंग्रजी लोकही पूर्वी रानटीच होते. परंतु रोमन लोकांच्या सहवासाने ते उद्योगी बनले.

यामुळे त्यांचा देश उद्योगाचे कोठार म्हणून तेथील लोकांचे सुधारणुकीचे पाऊल पुढे पुढे पडून ते विद्या कला उद्योगधंदे या प्रबल झाले. आपल्या देशात थोडेसे इंग्रज लोक व्यापाराला आले आणि त्यांनी एक प्रचंड राज्य स्थापन केले. हा त्यांच्या दृढ उद्योगाचा व बुद्धी शक्तीचा चमत्कार आहे. यात दैवाचा संबंध नाही. दैव प्रारब्ध यावर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून त्यांचा देव नेहमीच दुसऱ्याच्या गुलामगिरीत राहतो याचे ढल ढ ळीत उदाहरण आपले हिंदुस्तान होय.

विद्या दान

या विषयावरील भाषणात सावित्रीबाई फुले म्हणतात. बहुत माणसाजवळ दया उदारता परोपकार वगैरे सदगुण असून तारतम्याने व दूरदृष्टीने त्यांचा सदुपयोग न होता त्यांचा भलताच परिणाम घडून आलेला आढळतो .

दान धर्म दया उपकार इत्यादी पासून समाजावर दुष्ट परिणाम उत्पन्न न होता तो कल्याणकारी कायदा होईल. विद्या देणारा व विद्या घेणारा. असे दोघेही या धर्माच्या योगाने खरी खरी माणसे नेतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोभ होतो. विद्या देणारा धैर्यशाली निर्भय बोलून. विद्या घेणारा सामर्थ्यशाली शहाणा बनतो. इंग्रज भट लोकांना विद्यादान करून लोकांना शहाणे करतात.

हे खरे शहाणे भट

आमचे भट लोकांना अशिक्षित ठेवण्यात.

खरे तरबेज तथापि ते पक्के मूर्ख होत. इराणी हिंदुस्थानात घुसले व हिंदू स्तरात आपल्याच बापाचा मानू लागले होऊन आले, तेव्हा इराणी म्हणाले हा देश तुमचा नाही. पण होऊन घुसले व आपल्याच बापाचा मानून राहू लागले.

मुंगलाच्या बापाचा हिंदुस्तान होता की काय ?कोण जाणे? येथे त्यांनी आपले पाय रोले तेथे इतिहास असा आहे? की हिंदुस्तान हा इंडियन लोकांचा असून त्याच्यावर परकीय आणि राज्य केले .त्याला कारण आणि हेच होय दोन हजार वर्षे इंडियन लोक अज्ञानात राहून पशु जीवन जगावे हे महत्त्वाचे नसून तो भटभिक्षुकांचा कावा आहे. तो आपणास इंग्रजी ज्ञानाने उमगला असून उद्या दान करणे विषयी व विद्या प्राप्त होण्यास लोकास मदत करण्याविषयी लोकांची वासना बळावेल त्यावेळी आम्ही सुधारण्याच्या मार्गी लागू यामुळे समाजाचे हित होऊन प्रत्येकाचे सुख वाढेल इंग्रज सरकारने ज्ञानदानासाठी शाळा काढल्या, पण त्या थोड्या असून तेवढ्यावरच राहिल्या तर सारा हिंदुस्तान शिकलेला होण्यास आणखी दीडशे वर्षे लागतील. अशी माझी ठाम समजूत आहे. तरी देखील मी म्हणते, की सरकारने शिक्षण प्रसाराचा आपला वेग वाढवून सारे लोक विद्या शिकल्याशिवाय त्याने येथून जाऊ नये .महार मांगादी शूद्र अति शूद्र प्रत्येक गावात बारा बलुते बारा आलू ते व धनगर माळी कुणबी इत्यादी लोक राहत आहेत त्या लोकांजवळ ज्ञान कला शेवटपणा वगैरे गुण आहेत पण त्यांचा उपयोग आजपर्यंत सरकारने करून घेतला नाही.

सदाचरण कर्ज व्यसने या तीन विषयावरील भाषणे सुद्धा अत्यंत विचार परिलुप्त आहेत. सावित्री फुले या अध्यय स्त्री शिक्षिका होत्या. पहिल्या स्त्री शिक्षका होत्या. एवढ्या एका क्षेत्रातील त्यांच्या भूमिकेचे कृतज्ञ स्मरण करणे, किंवा गौरवीकरण करणे. याहीपेक्षा त्या शूद्रातील शूद्र यांच्या गुलामीची कारणमीमांसा भाषणातून करत होत्या. चिकित्सा करत होत्या .तर्क मांडत होत्या. हे समजून घेण्याची खूप गरज आहे.

भारतीय सुधारकांच्या परंपरेत स्त्री सुधारक सावित्रीबाई फुले यांची सूक्ष्म भान असलेली भाषा देव आणि शोषण नाकारणारी भाषा दैवाला लाथाढणारी भाषा विद्या दानाचे अतिव महत्त्व कथन करणारी भाषा त्यांनी आपल्या भाषणांमधून वापरून १८५२ ते १८९२ या कालखंडामध्ये स्त्रियांच्या प्रबोधनाचे युग रचले व पुढे नेण्यासाठी त्यात कष्टात राहिल्या याचे कृतज्ञभान तमाम शूद्र ती शूद्र आणि स्त्रिया ठेवतील हे निश्चितच परंतु सुधारक विचार आणि भाषा आणि प्रबोधनाचे निरंतर चक्र गतिमान ठेवणे, त्यासाठी सांस्कृतिक चिकित्सेचे धर्म ईश्वर गुलामी बहुदेव वाद याचे भान असणे. खूप आवश्यक आहे. अन्यथा प्रबोधन हे मानसिक गुलामीच्या निर्मूलनाशिवाय सतत पराभूत होत असते .याचे भान सर्व सुधारकांच्या अंगी असते. ते स्त्रीमुक्तीदायी जीवनाचा आक्रोश करणाऱ्या नव्या स्वातंत्र्य आकांक्षा यांच्या दिशेने पुढे जाणाऱ्या तमाम जगताला ईश्वर भयवाद सोडावा लागेल.

दैव नाकारावे लागेल तरच सावित्रीबाई फुले यांच्या भाषा आणि भाषणांचा सार्थ अर्थ समजून घेतल्यासारखे होईल आणि त्याची वर्तमानासाठी निश्चित उपयुक्तता ठरेल असे वाटून राहते.

**– शिवाजी राऊत,**
**सातारा**



## कल्याण मधील बळीत मुलीच्या कुटुंबियांची केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली सांत्वनपर भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनीधी : कल्याण मधील चक्कीनाका येथील १२ वर्षांच्या अल्पवयीन निरागस मुलीची अत्याचार करून हत्या करण्यात आल्याचा प्रकार माणुसकीला काळीमा फासणारा असून यातील दोषी आरोपींना कठोरता कठोर फाशीची शिक्षा करावी अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केली.आज कल्याण मधील चक्की नाका येथील बळीत मुलीच्या कुटुंबियांची ना.रामदास आठवले यांनी सांत्वनपर भेट घेतली.यावेळी रिपब्लिकन पक्षातर्फे १ लाख रुपयांची सांत्वनपर आर्थिक मदत लवकरच करणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी जाहीर केले.पीडित मुलीच्या कुटुंबाला राज्य सरकार तर्फे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून भरीव आर्थिक मदत मिळवून देण्याचा आपण प्रयत्न करू असे आश्वासन ना. रामदास आठवले यांनी दिले.यावेळी स्थानिक आमदार सुलभा गायकवाड, पद्मश्री कल्पना सरोज , सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याण घिटे, आदी अनेक उपस्थित होते.

कल्याण मधील अवघ्या १२ वर्षांच्या निरागस मुलीची अत्याचार करून हत्या करणारा नराधम गुन्हेगार असून परिसरात त्यांनी अनेक वाईट कृत्ये केली आहेत. चक्कीनाका या परिसरात धोकदायक इमारत असून या इमारतीचा वापर गुन्हेगार आरोपीने दुष्कृत्य करण्यासाठी केला आहे.मनपाने धोकादायक म्हणून घोषित केलेल्या इमारती मधील अनेकांनी घरे रिकामी केली असल्याने ही इमारत निर्जन झाली असून त्याचा वापर गुन्हेगार करीत होता.याच इमारतीत गुन्हेगाराने अल्पवयीन मुलीची अत्याचार करून हत्या केली.त्यामुळे ही इमारत कल्याण डोंबिवली मनपा ने त्वरित तोडून टाकावी अशी मागणी बळी गेलेल्या मुलीच्या परिवाराने आणि स्थानिक रहिवासीयांनी ना.रामदास आठवले यांच्या कडे करताच ना.आठवलेंनी केडी एम सी च्या आयुक्त इंद्रायणी जाखड यांना दृध्वनी करून संबंधित धोकादायक इमारत तपासून निष्कासित करण्याचे निर्देश दिले.

अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणाच्या अत्याचाराच्या अमानुष घटना घडत असून समाजात माणुसकीला काळीमा लावणाऱ्या या घटना रोखल्या पाहिजेत त्यासाठी सरकार पोलीस आणि जागृत सामाजिक कार्यकर्त्यांनी ही पुढे आले पाहिजे असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले.

## रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर: सुधाकर रणदिवे, दि. ३/१/२०२५ शुक्रवार रोजी रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर ता. रेणापूर जिल्हा लातूर येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रम सुर करण्यात आला. त्यानंतर डी.एल एड च्या छात्र अध्यापकांनी सावित्री बाई फुले यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर करून सावित्री बाई फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रेणूका पब्लिक स्कूल चे प्राचार्य बाबासाहेब बरिदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेणुका अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य शशिकांत चीलरगे हे उपस्थित होते.

या वेळी, डॉ हिरकण शेटकर , प्रा.रतन लहाने, प्रा.उमेश रणदिवे,प्रा रमाकांत गायकवाड, राधिका माने, ग्रंथपाल मनीषा लातूरकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापक हरिओम माने यांनी केले.तर आभार प्रदर्शन सुदर्शन माने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डी .एल .एड च्या सर्व छात्र अध्यापकांनी व दत्ता चादरे यांनी सहकार्य केले.



## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता श्री खांडेकर, प्र.तहसीलदार सचिन मुळीक, कार्यकारी अभियंता सोमशेखर हरसुरे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## वृषाली सानप विद्यावाचस्पती पदवीने सन्मानित

### पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ वृंदावन येथे सेवानिवृत्त न्यायाधीश देवेंद्र कुमार जैन यांच्या हस्ते सानप यांना पदवी बहाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : श्रीमानयोगी शिवछत्रपती शेतकरी विद्यालय, गूळवंच तालुका -सिन्नर जिल्हा-नाशिक.येथिल अध्यापिका वृषाली लक्ष्मण सानप यांना नुकतेच पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ,वृंदावन धाम,उत्तरप्रदेश यांचे वतीने सेवानिवृत्त न्यायधीश देवेंद्रकुमार जैन मध्यप्रदेश. व.श्री पंडित दीनदयाल उपाध्याय, विद्यापीठाचे कुलगुरु यांचे हस्ते विद्यावाचस्पति (डॉक्टरेट)पदवी बहाल करण्यात आली. नुकतेच मुख्याध्यापक संघाच्या वतीने सिन्नर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष व नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस .बी.देशमुख यांचे हस्ते वृषाली सानप यांचा सन्मान करण्यात आला.वक्ता,लेखिका,कवयत्री,व्यवस्थापक,सूत्रसंचालक अश्या बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या वृषाली सानप या ३० वर्षापासून हिंदी विषयावरील असलेल्या प्रगाढ़ प्रेमामुळेच सातत्याने हिन्दीत लेखन करीत आहेत. त्यांनी शबरी खंड्य कांव्यका का अनुशिलन. या विषयावर एम. फिल. केलेले असून हिंदी प्रचार व प्रसारचे मोठे काम त्यानी आजवर केलेले आहे.हिंदी भाषेत त्यांची आजवर ४ काव्यसंग्रह प्रकाशित असून त्यानी क्या है आध्यात्म ? या विषयावर अत्यंत सखोल चिंतन व अभ्यासाच्या आधारे ९५ लेख इंटरनेटच्या माध्यमातून समाजासमोर मांडले आहेत, ज्यात त्याच्या आध्यात्मिक साधनेची योग दृष्टि झलकते. शाळेतील सन्मानसोहळ्याचे सूत्रसंचलन सुरेखा जगताप यांनी केले.या प्रसंगी मुख्याध्यापक मधुकर काळे, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, गुळवंच ग्राम पंचायत सदस्य संतोष सानप, संस्था कुटुंबातील सदस्य प्रकाश सानप हे उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# क्रांतीज्योती सावित्रीबाईंचे विचार आजही उर्जा देतात

## डी.वाय.एस.पी. विजयालक्ष्मी कुरी; स्वेरीमध्ये 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांची १९३वी जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर:'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी अनेक हालअपेष्टा सहन करून स्त्रियांनी शिकावे, सावरावे आणि सुशिक्षित व्हावे यासाठीआपलेजीवन वेचले. आजची महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कार्य करत असताना आणि सर्वांच्या अपेक्षा पूर्णकरताना स्वतःची हेळसांड होते, याकडे मात्र दुर्लक्ष करते. एक स्त्री म्हणून आपली कुठे, कशी, किती गरज आहे हे ओळखूनतीकाम करते. हे काम करत असतानामात्र त्यांनाआपल्या कर्तव्याचा विसर पडू नये. आपण कितीही मोठे अधिकारी असू दे, स्वतः मधील'ईगो'आपण बाजूला ठेवायचा त्यामुळे समोरची व्यक्तींचीविचारशक्ती, असलेलेमतभेद समजून येतात.हे सर्व शिक्षणामुळे शक्य होते. त्यामुळेक्रांतीज्योती सावित्रीबाईंचे विचार आजही आपल्याला उर्जा व प्रेरणादेतात.'असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा (ग्रामीण) च्या पोलीस उपअधीक्षक तथा डी.वाय.एस.पी. विजयालक्ष्मी कुरी यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९३ व्याजयंती निमित्त डी.वाय.एस.पी. विजयालक्ष्मी कुरी हया मार्गदर्शन करत होत्या. संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र गीत, स्वेरी गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनानंतर डी.वाय.एस.पी. विजयालक्ष्मी कुरी यांनी'स्वेरी कॉलेज स्त्री शिक्षणाचे माहेरघर आहे.आम्हालाएक स्त्री या नात्याने याचासार्थ अभिमान आहे' हा मेसेज दिला. प्रास्तविकातून स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे म्हणालेकी,'महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या फुले दांपत्यांच्या माध्यमातून महिलांसाठी व त्यांच्याशिक्षणासाठी एक देणगी मिळाली आहे.पूर्वी सर्वात वंचित घटक म्हणून स्त्रीकडे पाहिले जायचे. त्यावेळी स्त्रीला कसं-बसं जगण्याचा अधिकार होता. शिक्षण घेण्याची बंदी होती. १८४८ साली सावित्रीबाई फुले यांनी भिडे वाड्यामधून मुलींसाठी पहिली शाळा काढली. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन 'चूल आणि मूल' एवढाच होता. त्यावेळी फुले दांपत्याने पुढे येऊन समाजाची मानसिकता बदलण्याची भूमिका घेतली. तेथून खऱ्या अर्थाने महिला शिक्षित झाल्या. त्यावेळी शाळेत जाताना होणारा त्रास, अन्याय त्यांनी पचवले. ध्येयापासून विचलित झाल्या नाहीत.' असे सांगून 'इगो पासून दूर रहा, माझं खरं आहे असं वाटत असताना समोरच्या व्यक्तीचेही खरे असू शकते ही मानसिकता तयार करा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'संयम' राखणे आवश्यक आहे. त्यामुळे आपले विचार धाडसाने सादर करता आले पाहिजेत, हे महत्वाचे तीन कानमंत्र त्यांनी दिले. पुढे बोलताना डी.वाय.एस.पी. विजयालक्ष्मी कुरी म्हणाल्या की, 'स्वेरीमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. त्याचे कारण म्हणजे या ठिकाणी संरक्षण, भीती मुक्त वातावरण, मुलींकडे वैयक्तिक लक्ष, योग्य निर्णय त्यामुळे या ठिकाणी प्रवेशासाठी प्रचंड गर्दी होते. परिस्थितीनुसार समोरच्या व्यक्तीची विचारसरणी, भावना ओळखणे आवश्यक आहे. आपल्यातील कमतरता दाखविण्याऐवजी वर्तणूक सावध असावी. फुले दाम्पत्यांच्या माध्यमातून महिलांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे, म्हणून वेळप्रसंगी आपल्यातील शक्ती जागृत करणे आवश्यक आहे. आजच्या युगात सोशल मीडिया वापरताना होणार्या चुका सुधारणे आवश्यक आहे. मोबाईल, लॅपटॉप या साधनांचा आवश्यक तेवढाच वापर करा. सध्या बरेच सायबर क्राईम घडत आहेत त्यामुळे सजग रहा,संगणकाचा वापर कमीत कमी करा. स्वतः अपडेट रहा, प्रगती करताना आपली अधोगती होणार नाही याची काळजी घ्या. संगणक युगामध्ये तंत्रज्ञानाचा वापर अचुक करा अशा प्रकारे त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक सूचना दिल्या. आपण महापुरुषांच्या जयंत्या यासाठी साजरा करतो की त्यांच्यातील महत्त्वाचे गुण आपल्याला प्रेरणा देत राहावेत.'असे सांगून विद्यार्थिनींना प्रेरणादायीमार्गदर्शन केले. पो.कॉ.स्वाती लोंढे यांनी निर्भया पथकातील कामकाजाचे स्वरूप सांगताना विद्यार्थिनींना महत्त्वाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनीघरी जाताना, प्रवासात, वाहतुकीच्या वेळी वाहनावर असताना कोणी पाठलाग करत असेल, त्रास देत असेल तर अशा वेळेस निर्भया पथकाकडे तक्रार द्यावी. लहान जखम असताना वेळीच उपचार केले तर जखम मोठी होणार नाही. यासाठी आपल्याला दिलेल्या संस्कारावरून चालणे गरजेचे आहे. अनोळखी व्यक्तीचे 'रिक्वेस्ट' स्वीकारू नयेत, ध्येय समोर ठेवून वाटचाल करावी. जर अडचण आलीच तर निर्भय पथकाचा मोबा.क्र.-८९९९९३८०८० यावर संपर्क साधावा. तत्काळ कारवाई करून पुढील उपाययोजना केली जाईल. त्याचबरोबर जर कुठे बालविवाह होताना आढळल्यास १०९८ क्रमांक आणि महिलांच्या अडचणी असतील तर ११२ क्रमांकावर संपर्क साधावा असे त्यांनी आवाहन केले. अध्यक्षपदावरून बोलताना संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की,'नोकरी करत असताना स्त्रियांना वेगवेगळ्या प्रसंगांना सामोरे जावे लागते. स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रेरणेने आपण आत्मविश्वासाने सामोरे जावे लागेल. असे सांगून संत नामदेव, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई आदी संतांचे उदाहरण देवून 'आता विश्वात्मके देवे....' याचे महत्व पटवून दिले. यावेळी निर्भय पथकाच्या पो.कॉ.निर्मला वाघमारे, प्रा. रोहित कुरी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार,उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, वसतिगृह व्यवस्थापक डॉ. करण पाटील,इतर प्राध्यापिका उपस्थित होत्या. डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



**स्वेरीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९३ वी जयंती प्रसंगी डावीकडून स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे,संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे,उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार,विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डी.वाय.एस.पी. विजयालक्ष्मी कुरी.**

### ये तो सिर्फ झाकी है...

**स्वेरीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती नेहमी मुलींच्या वसतिगृहात साजरी केली जाते. पण सध्या परीक्षा सुरु असल्यामुळे विद्यार्थिनी परीक्षेत व्यस्त आहेत. त्यामुळे वसतीगृहाऐवजी इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्येहा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी फक्त डिप्लोमाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या तरीही संपूर्ण हॉलतुडुंबभरला होता.त्यातूनविद्यार्थिनीचे उत्साही चेहरे पाहून डी.वाय.एस.पी. विजयालक्ष्मी कुरी ह्या देखील प्रभावित झाल्या आणि पोलीस खात्यातीलपोलीस उपनिरीक्षक पासून तेडी.वाय.एस.पी.पर्यंतचा २६ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव सविस्तर सांगितला. यावेळीविद्यार्थिनी महत्वाच्या सूचना टिपून घेतअसल्याचे पाहून त्याभारावून गेल्या. यावेळी सचिव व प्राचार्य डॉ.रोंगे यांनी 'ये तो सिर्फ झाकी है, अभी पुरा आसमान बाकी है...'**

**असे म्हणतवसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या विद्यार्थिनींची आकडेवारी सादर केली.**

### थोडक्यात...

#### बच्चू कडूंचा अखेर राजीनामा; दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्षपद सोडले

मुंबई : मंत्रालय झाल्यानंतरही दिव्यांगांना मानधन मिळत नाही. स्थानिक स्वराज्य संस्था दिव्यांगांसाठी तरतूद असलेला पाच टक्के निधीही खर्च करीत नाहीत. अजूनही या विभागासाठी स्वतंत्र मंत्री नाही, सचिव नाही. जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र कार्यालय नाही, पदभरती नाही. इतर अनेक बाबींची पूर्तता झालेली नाही. दिव्यांगांच्या सर्वांगिण विकासासाठी आंदोलन करावे लागणार आहे, असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयाचे काम सुरू झाले नसल्यावरून संतप्त माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण अभियानाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांनी आपला हा राजीनामा पाठविला आहे. बच्चू कडू यांनी आपल्या राजीनाम्यात देशातील पहिले दिव्यांग मंत्रालय राज्यात निर्माण केल्याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहे. सोबतच दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयाचे काम सुरू झाले नसल्याकडेही लक्ष वेधले. या विभागाच्या अध्यक्षपदावर राहताना कामे होण्याची शक्यता दिसून येत नाही. दिव्यांगासोबत बेईमानी करणे शक्य नसल्याने आपण दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियानाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सदर राजीनामा मंजूर करून सहकार्य करावे, मला असलेली सुरक्षासुद्धा काढून टाकावी व कुठलीही सुरक्षा ठेवण्यात येऊ नये, असेही पत्रात म्हटले आहे.




## फुले विद्यालयाचे प्राध्यापक लोंढे सेवानिवृत्त

### आ. सत्यजित तांबे यांचे उपस्थितीत प्रा.लोंढे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्था संचलित महात्मा फुले माध्यमिक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य रामनाथ एकनाथ लोंढे हे आपल्या ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नुकतेच सेवानिवृत्त झाले असून आमदार सत्यजित तांबे यांचे प्रमुख उपस्थितीत ज्वालामाता लॉन्स येथे प्राध्यापक लोंढे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे माजी प्राचार्य निवृत्ती महात्मे हे होते तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक आमदार सत्यजित तांबे संस्थेचे सेक्रेतरी नामदेव लोणारे संस्थेचे माजी अध्यक्ष चंद्रकांत वरंधळ मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष एस बी देशमुख संस्थेचे माजी संचालक राजेंद्र गोळे प्राचार्य लोंढे यांच्या पत्नी संगीता लोंढे आधी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी क्रांतीसुर्य महात्मा फुले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच प्राचार्य लोंढे यांचे पिताश्री यांचे प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली महात्मा फुले विद्यालयाचे पर्यवेक्षक देशमुख यांनी प्राचार्य लोंढे यांचे कार्य विषयी आपल्या प्रास्ताविकातून माहिती दिली आमदार सत्यजित तांबे यांनी प्राध्यापक प्राचार्य लोंढे यांचे कार्याचे कौतुक करून भावी वाटचालीस शुभेच्छा देऊन संस्थेच्याही कार्याचे कौतुक केले यांप्रसंगी एस बी देशमुख, राजेंद्र महात्मे, नामदेव लोणारे यांनी प्रा. लोंढे यांचे कार्य विषयी कौतुक करून शुभेच्छा दिल्या प्राचार्य लोंढे व त्यांच्या विद्य पत्नी संगीता लोंढे यांचा सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्थेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

महात्मा फुले शैक्षणिक संकुलाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने प्रा.लोंढे यांचा सत्कार करण्यात आला असून प्रा.लोंढे कुटुंबियांच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला या सेवापूर्ती गौरव समारंभासाठी सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी माजी पदाधिकारी आजी माजी मुख्याध्यापक शिक्षक वृंद सेवक वृंद, सर्व समाज बांधव सरांचा मित्रपरिवार सर्व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते यांप्रसंगी महात्मा फुले विद्यालयाच्या सांस्कृतिक प्रमुख सविता काठे व क्रीडा शिक्षक किरण मिठे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती आर. व्ही. लोंढे व संकुलाच्या सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

## जि.प. जूनी सावरट मराठी शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवापूर/प्रतिनिधी : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त नवापूर तालुक्यातील कोळदा केंद्रातील जिल्हा परिषद जूनी सावरट मराठी शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा दर्शना वसावे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगत, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.

**हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेने शैक्षणिक साहित्य वाटप करून जपली सामाजिक बांधिलकी**

यावेळी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा दर्शना वसावे, मुख्याध्यापिका सुषमा कुवर, सहशिक्षिका रंजीता कापडनिस विद्यार्थी उपस्थित होते.



## रोजगार हमीच्या कामावर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोंडगांव देवी : आता हिवाळा ऋतू सुरू आहे आणि या दिवसात गावामध्ये कोणत्याही प्रकारचा रोजगार नसून मोलमजुरी करणारी गोरगरीब जनता हि आपल्या पोटाची खडगी भरण्यासाठी हाताला काही रोजगार मिळण्याकरिता मोठया प्रमाणात परराज्यात कामाच्या शोधात भटकंती करू लागल्याने अर्जुनी मोरगांव तालुक्यातील खांबी येथे ता.२ जानेवारी २०२५ पासून रोजगार हमी योजनेच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

खांबी येथील रोजगार हमी योजनेच्या कामावरती मोठया प्रमाणात महिलांच्या उपस्थितीत ता.३ जानेवारी भारतातील पहिली महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठया उत्साहाने साजरी करण्यात आली.

यावेळी सरपंच निरूपा बोरकर, तंटामुक्त अध्यक्ष विकास डुंबरे, ग्रा.पं सदस्य शालू खोटेले, माजी ग्रा.पं सदस्य सरीता कोसरे, रोजगार सेवक लीलाधर राऊत, व्ही. के. सोसायटी अध्यक्ष नामेश्वर खोटेले, ग्रा.पं संगणक चालक योगेश लोणारे, सपना उरकुडे, राहुल ब्राम्हणकर, कमलेश शेंडे आदी प्रामुख्याने मोठया प्रमाणात उपस्थितीत होते.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पाटचारी दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झाली असून गावातील गोरगरीब जनता हि परराज्यात भटकंती करत जाऊ नये म्हणून खांबी या गावातील नागरिकांच्या हाताला काम देण्यात आले आहे.

### गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांवर करडी नजर ठेवणार — पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे

# सांगोला पोलिसांची धडक कामगिरी: सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील आठ गुन्हेगारांना केले हद्दपार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वेगवेगळ्या गुन्ह्यातील सराईत आठ गुन्हेगारांना सोलापूर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. यासह २६६३ जनावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे असून वाळू चोरी दारूबंदी, जुगार, गुटखा, अशा अनेक अवैध धंद्यावर ३१७ केसेस करण्यात आले असल्याचे पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांनी दिली आहे.

सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिक पुरुष महिला विद्यार्थी नवयुवक यांच्या मनामध्ये कोणत्याही गुन्हेगाराविषयी भीती दहशत निर्माण होणार नाही तसेच कॉलेजमधील शिक्षक घेत असलेल्या युवकांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीची लोकांकडे पाहून आकर्षण वाटून ते गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळू नये याकरिता सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील नागरिक विषयक महिला विषयक तसेच इतर अवैद्य विषयी गुन्हे करणारे सराईत आरोपींना वारंवार पटिबंधकत्मक कारवाई केलेली आहे पोलीस ठाणे हद्दीतील कायदा व सुव्यवस्था अबाधित होण्यासाठी सराईत गुन्हे जुगार गौण खजिना शरीर विषयक महिला विषयक विनयभंग व शासकीय नोकरीवरील हल्ले खून अॅट्रॉसिटी क्ट फसवणूक अशा वेगवेगळ्या कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल असलेल्या त्यांच्या परिसरातील लोकांना त्रास देण्याच्या सराईत आरोपीवर तक्रार देण्यास कोणी धजावत नव्हती व ज्या इसमाच्या विरुद्ध एक पेक्षा जास्त गुन्हे आहेत व त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे समाजातील लोकांमध्ये दहशत निर्माण झालेली आहे अशा आरोपींवर वेगवेगळ्या हेड खाली कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करून प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कारवाई केल्यामुळे सन २०२४ मधील सर्व शिक लोकसभा विधानसभा निवडणूक भयमुक्त वातावरणात पार पडले आहे तसेच चालू वर्षात महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ व ५५ प्रमाणे mp३ प्रस्ताव पाठवून देऊन एकूण झिरो आठ इस्मंना प्रमाणे सोलापूर जिल्ह्यातून हद्दपार स्थानबद्ध करून त्यांच्यामध्ये कायद्याची जाणीव निर्माण करण्यात आले असून आगामी सन २०२५ मध्ये सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील व गावातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर किडीने जर ठेवून तसेच ज्येष्ठ नागरिक महिला अल्पवयीन मुलींची छेड काढण्याचे अनेक लोक यांच्यावर प्रभावी कारवाई करण्याचे ध्येय आम्ही नववर्षात घेतले आहे हे असं सांगोला पोलीस ठाणे हद्दीतील सर्व अवैध धंद्याची समोर उच्चाटन करण्यात संकल्प केला आहे.

सदरची कामगिरी मा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी सोलापूर ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर मा श्री विक्रांत गायकवाड उपयोगी पोलीस अधिकारी मंगळवेढा उपविभागीय मंगळवेढा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक भीमराव खंणदाळे सापोली मोरे स.पो.नि.मोरे.पो.स.इ.पुजारी. दामिनी पथकाचे. पो.स.इ. चव्हाण उबाळे, घावणे. यांनी त्यांच्या टीमने सदरची कारवाई केली आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या द्विशताब्दीपर्यंत स्मारकाचे काम पूर्ण करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## आराखड्यानुसार स्मारकासाठी निधी देणार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा/प्रतिनीधी : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची आणखी पाच वर्षांनी द्विशताब्दी साजरी होणार आहे. त्यापूर्वी त्यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करा. त्यासाठी प्रशासनाने १० एकर जमिनीचे तात्काळ अधिग्रहण करावे, असे निर्देश देऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानाला साजेशा भव्य स्मारकासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन व सातारा जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंती निमित्त नायगाव, ता. खंडाळा येथे आयोजित सावित्रीमाई जयंती उत्सवास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पर्यटन, खनिकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, आमदार सर्वश्री छगन भुजबळ, अतुल भोसले, मनोज घोरपडे, सचिन पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले आदी मान्यवर उपस्थित होते.

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दाखवलेल्या सन्मार्गावर चालून शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचे काम करू, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जिवंत स्मारक म्हणजे सक्षम महिला होय. त्यांचा विचार समाजात तळागाळापर्यंत रुजवून स्वयंपूर्ण व स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभारणाऱ्या महिला घडविण्याचे कार्य शासन करेल. महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाल्याने पुढील काळात निश्चितपणे महिलाराज येईल. केंद्र शासनाच्या लखपतीदीदींसारख्या योजनेच्या माध्यमातून येणाऱ्या दोन तीन वर्षात ५० लाख महिलांना लखपती दीदी घडविण्याचे कार्य शासनाने हाती घेतले आहे.

या देशावर, महाराष्ट्रावर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे फार मोठे उपकार आहेत, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्या काळात स्त्रियांना गुलामाप्रमाणे वागणूक मिळत होती त्या काळात समाजातील विषमता दूर करून समतेचे बीजारोपण करण्याचे कार्य फुले दांपत्याने केले. शिव्या शाप, शेण गोळे खावे लागले तरी सावित्रीबाई फुले यांनी न डगमगता स्त्रियांना गुलामीतून बाहेर काढण्यासाठी शिक्षणाची ज्योत पेटवली. या कार्यात महात्मा फुले हे हिमालयाप्रमाणे त्यांच्या सोबत होते. त्यांनी विधवांच्या केशवपन, बालहत्या यासारख्या बाबींना कृतिशील विरोध केला. विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. समाज परिवर्तनाच्या अनेक चळवळींचे नेतृत्व सावित्रीबाई फुले यांनी केले, याची कबुली स्वतः महात्मा फुले यांनी अनेकदा दिलेली आहे. थोर माणसांचे कार्य कधीही संपत नाही, त्यांचे स्मारक उभा करत असताना पुतळ्यासोबतच विचारांचेही स्मारक झाले पाहिजे, असेही मत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी योवळी व्यक्त केले.

यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले. स्त्री शिक्षणाची सुरवात झाल्यामुळे आज महिला समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात यशाची शिखरे गाठत आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्म स्थान असलेले हे गाव ग्रामविकास मंत्री म्हणून मी दत्तक घेत आहे. यापुढे कामासाठी निवेदने येणार नाहीत, या पध्दतीने नायगावचा विकास केला जाईल. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव प्रेरणास्थान असून त्यांचे विचार उर्जा देणारे आहेत. त्यांच्या सन्मानाला साजेसे स्मारक उभारण्यासाठी दहा एकर जागा शासनाने खरेदी करावी व स्मारकासाठी १२५ कोटी रुपये द्यावेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक विकास आराखडा तातडीने मंजूर करावा, अशी मागणी केली. स्मारकाचे काम मंजूर झाल्यानंतर हे स्मारक दोन वर्षाच्या आत उभे राहील. या स्मारकामध्ये महिला सक्षमीकरणासाठी विविध प्रशिक्षणे देण्यात येतील. महिलांना स्वत:च्या पायावर उभे करुन आर्थिक सक्षम केले जाईल, अशी ग्वाहीही श्री. गोरे यांनी दिली.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील म्हणाले, १ जानेवारी १८४८ ला मुलींच्या पहिल्या शाळेची सुरुवात करून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी वर्षानुवर्ष प्रगतीपासून दूर असणाऱ्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यास सुरुवात केली. फुले दांपत्याने समाजाला दिशा दाखवण्याबरोबरच अंधकारातून व अंधश्रध्देतून बाहेर काढले. आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत याचे श्रेय फुले दांपत्याचे आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मस्थळ असलेल्या नायगावच्या विकासासाठी आतापर्यंत जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आले आहेत, यापुढेही ते अखंड सुरू राहतील. नायगाव हे आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्र व्हावे यासाठी प्रयत्न केले जातील.

आमदार छगन भुजबळ यांनी फुले दांपत्याचा विरोध हा ब्राह्मण्यवादाला होता, कोणत्या जातीपातीला नव्हता असे सांगून महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक कार्याचा उल्लेख केला. त्यांच्या जीवनातील महत्त्वाची ठिकाणे जोडण्याचे काम मार्गी त्वरित लावावे, तसेच सावित्रीबाई फुले यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार हा ३ जानेवारी रोजी नायगाव येथील कार्यक्रमातच दिला जावा, फुले दांपत्याच्या साहित्याचे पुनर्मुद्रण व्हावे अशी मागणीही त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मस्थळी यांच्या असलेल्या स्मारकास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यांनतर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शिल्पसृष्टीचीही पाहणी केली. या ठिकाणी स्मारक उभारणी आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमात विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये ब वर्ग पर्यटन क्षेत्रांतर्गत उभारण्यात आलेल्या शासकीय प्रतिक्षालयाचे उद्घाटन, जलजीवन मिशन अंतर्गत वॉटर एटीएमचे उद्घाटन, महाज्योतीच्या विविध योजनांच्या प्रदर्शन दालनांचे उद्घाटन, महिला बचतगटांच्या उत्पादित वस्तूंच्या विक्री स्टॉल्सचे उद्घाटन, जिल्हा परिषद शाळेतील निबंध चित्रकला व वकृत्त्व, स्पर्धेतील विजेते, विद्यार्थी यांच्या बक्षिस वितरण, यशस्वी महिलांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार मदन भोसले, सरपंच स्वाती जमदाडे, गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे, नितीन घुले यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला, अधिकारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## थोडक्यात...

### कल्याणमधील हवाई सुंदरीची ऑनलाईन, व्यवहारात नऊ लाखाची फसवणूक

कल्याण : कल्याण पश्चिमेत राहत असलेल्या एका चोवीस वर्षाच्या हवाई सुंदरीची ऑनलाईन व्यवहारात अनोळखी व्यक्तिने नऊ लाख ९३ हजार रूपयांची




फसवणूक केली आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये घडलेल्या फसवणूक प्रकरणाची महिलेने गुरुवारी महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. या महिलेने पोलीस पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की आपण २३ नोव्हेंबर २०२४ रोजी घरी असताना संध्याकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान एका अज्ञात व्यक्तिचा आपणास आपल्या मोबाईल क्रमांकावर फोन आला. तुम्ही जे पार्सल इराणला पाठविले होते. ते अद्याप तेथे पोहचलेले नाही,असे त्याने आपणास सांगितले. त्यावेळी आपण तात्काळ त्या इसमास ते पार्सल आपण पाठविलेले नाही, असे सांगितले.

---



## हायटेक इंग्लिश स्कूल येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील येणेगूर येथील हायटेक इंग्लिश स्कूल मध्ये ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी स्कूलच्या मुख्याध्यापक सरस्वती मोरे, प्रमुख पाहुणे म्हणून सौ. महादेवी चंडके, पांचाळ प्रतिभा, हिंगमिरे अल्का सांस्कृतिक विभाग प्रमुख स्मिता पोदार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले.

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल काही विध्यार्थीनी भाषणे केली. तसेच इ. ६,७वी च्या मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत नाटक सादर करण्यात आले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सोनबा इंगवे यांनी केले, या कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

---

## सामाजिक समतेचा पाया फुले दांपत्याने उभा केला : सुनिल वारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध, जोतिराव फुले, संत कबीर यांना गुरुस्थानी मानले. महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीमाई फुले यांनी महिलांसाठी, अस्पृश्यासाठी शाळा सुरू करून सामाजिक समतेचा पाया उभा केला त्यांनी नाही रे वर्गांना मानवतेच्या दृष्टिकोनातून शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

महापुरुषांच्या कार्याची आठवण करून त्यांचे कार्य आपण सार्वजनिक जीवनात आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी बोलताना व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे येथे सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मा. महासंचालक श्री वारे यांनी सावित्रीमाईच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा व्यक्त करून मार्गदर्शन केले.

महात्मा फुले वाडा पुणे येथील स्मारकात बार्टीच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीमाईच्या अर्थ पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. विभागप्रमुख




श्रीमती स्नेहल भोसले, वृषाली शिंदे, रजनी वाघमारे यांनी सावित्रीमाईच्या कार्याला उजाळा दिला.

प्रकल्प अधिकारी जागृती गायकवाड, तेजस्विनी सोनवणे, गौरी वाघमारे यांनी पहिली माझी ओवी ग सावित्रीच्या बुद्धीला ही ओवी सादर केली.

यावेळी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्री उमेश सोनवणे, श्रीमती नसरिन तांबोळी, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्रीमती वैशाली खांडेकर यांनी केले. आभार श्रीमती जागृती गायकवाड यांनी मानले.

---

## बेवारस मयताबाबत पोलीसांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे अंर्तगत दि .२८ जानेवारी रोजी मौजे आंदेवाडी ( ज ) ता अक्कलकोट शिवारातील रेल्वे ट्रॅक जवळील पोल क्रं५१२ जवळ रेल्वे ट्रॅकच्या बाजू असलेल्या शेतात एक पुरुष बेशुद्ध अवस्थेत पडलेले असता पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे दाखल उपचारापूर्वीच मयत झाल्याचे वैध्यकीय अधिकार्यानी घोषीत केले.

मयताची ओळख वय५५-६० अंदाजे . अंगात मळलेले निळ्या रंगाची फुल पॅन्ट जुनी वापरत अशा प्रकारचे वर्णन असून तरी सदर मयताचे नातेवाईक असल्यास अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यास संपर्क साधावे. तपास पो. उपनिरीक्षक सतपाल कांबळे हे करीत आहेत.



---

ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन

लोकनेते राजाभाऊ सरवदे यांनी संबोधित केले

## कोळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहारास सांगोला रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अस्थी कलश देण्यात आला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यातील कोळे येथे विश्वरत्न भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्थी विहार स्मारक या ठिकाणी चांदीचा कलश रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) सांगोला यांच्या वतीने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या हस्ते देण्यात आला.

सर्वप्रथम ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी लोकनेते राजाभाऊ सरवदे यांनी संबोधित केले. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व सांगोला,कोळा



परिसरातील सर्व मान्यवर आजी,माजी पदाधिकारी, समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

---



## पुरंदर तालुका प्राथमिक शिक्षक संघाच्या २०२५ दिनदर्शिकेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, पुरंदर तालुका शिक्षक संघा तर्फे तयार करण्यात आलेल्या २०२५ या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन संघांचे ज़िल्हा अध्यक्ष श्री बाळासाहेब मारणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पुरंदर तालुका शिक्षक संघांचे अध्यक्ष श्री तानाजी फडतरे व त्यांचे सर्व सहकारी शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते. सदर दिनदर्शिका अत्यंत सुबक असून पूर्ण वर्षाची महत्वाची माहिती देण्यात आली आहे.

दिनदर्शिका तयार करण्याचे कार्य तालुका संघांचे काम उल्लेखनीय आहे. असे ज़िल्हा अध्यक्ष बाळासाहेब मारणे यांनी सांगितले.